MHGA040003082021

नि.दि.दा.क्र.८/२०२१
सपन -वि- ललीता+२
MHGA040003082021

**निशाणी क्र. २३ वरील आदेश**
(पारीत दि.२२ फेब्रुवारी, २०२२ रोजी)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी लेखी बयाण दाखल करण्यास परवानगी मिळण्याबाबत सादर केलेला आहे.

२. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी हे मागील तारखेस बाहेरगावी गेले असल्यामुळे विहीत मुदतीत लेखी बयाण दाखल करु शकले नाहीत. त्यामुळे लेखी बयाण दाखल करण्यास परवानगी देण्यात यावी.

३. प्रस्तुत अर्जावरच वादीने त्याचे म्हणणे देवुन आक्षेप नोंदविला आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादीने मुदतीत लेखी बयाण दिले नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. प्रतिवादी व वादीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी हे बाहेरगावी गेल्यामुळे लेखी बयाण दाखल करु शकले नाहीत. लेखी बयाण अभिलेखावर आल्यास सदर दाव्याचा गुणानुगुणावर निपटारा होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. तथापी, लेखी बयाण अभिलेखावर न आल्यास प्रतिवादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, वरील कारणांचा विचार करुन न्यायाचे उध्दिष्ट साध्य करण्यासाठी खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादीचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. लेखी बयाण अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. लेखी बयाण अभिलेखावर घेण्यात येत आहे.

Digitally signed by ravindra anandrao sawant
Date: 2022.02.22 17:58:19 +0530

(आर.ए. सावंत)
दिवाणी न्यायाधिश(क.स्तर)
आरमोरी.

दि.२२.०२.२०२२